# पुणे विद्यापीठ


परीक्षा विभाग

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि– २५६०१२११
मॅनेज/लॉ/शि.शा. –२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४

वेबसाईट www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in


संदर्भ : परीक्षा / अभि. / कॅप / १४१

दि.१२.४.२०१२

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न अभियांत्रिकी महाविद्यालये.

विषय : मे / जून,२०१२ मध्ये होणा-या एफ.ई.,एस.ई. व टी.ई.[२००८ अभ्यासक्रम] परीक्षांचे टर्मवर्कचे गुण सी.डी. मध्ये देण्याबाबत...

महोदय / महोदया,

आपणांस विदीत आहेच की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर / नोव्हेंबर,१९९८ पासून पदवीपूर्व अभियांत्रिकी परीक्षेचे अंतर्गत तपासणीचे टर्मवर्क गुण सी.डी.मध्ये देण्याच्या पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यानुसार मे / जून,२०१२ मध्ये होणा-या एफ.ई.,एस.ई. व टी.ई.[२००८ अभ्यासक्रम] परीक्षेस द्वितीय टर्मला बसणा-या सर्व विद्यार्थ्यांचे सर्व विषयांचे टर्मवर्कचे गुण अंतर्गत तपासणी झाल्यानंतर सी.डी.मध्ये द्यावयाचे आहेत. त्याबाबतच्या सर्व सूचना यापूर्वीच दिलेल्या आहेत. परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांचे लक्षपूर्वक अवलोकन करून त्याप्रमाणे सी.डी.करण्याबाबत आपल्या महाविद्यालयातील संबंधित काम करणा-या कर्मचा-यांना सूचना द्याव्यात. सदर सूचनांबाबत काही शंका असल्यास त्वरित विद्यापीठाशी संपर्क साधावा.

सी.डी.मध्ये सर्व प्रथम परीक्षार्थी [Fresh Students] विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक आले आहेत व त्यापुढे गुणांची नोंद झालेली आहे, तसेच अभ्यासक्रमानुसार टर्मवर्कच्या एकूण गुणांपैकी गुण दिले आहेत, याची खात्री करावी. एखादा विद्यार्थी टर्मवर्कमध्ये अनुपस्थित असेल तर त्याचे बैठक क्रमांकापुढे AA असे लिहावे. सी.डी.मधील टर्मवर्कचे गुण प्रिंटआऊट मधील टर्मवर्कचे गुण समान असणे आवश्यक आहे. कोणताही बैठक क्रमांक वगळू नये. सी.डी.मध्ये अंतर्भूत नसलेल्या विद्यार्थ्यांचे टर्मवर्कचे गुण लेखी परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

एफ.ई., एस.ई. व टी.ई. परीक्षेच्या टर्मवर्कच्या गुणांच्या दोन सी.डी. एक प्रिंटआऊटसह दि. ३०.४.२०१२ पर्यंत विद्यापीठ कार्यालयाकडे पाठवाव्यात. सी.डी.साठी येणारा खर्च परीक्षेसाठी येणा-या अनुदानातून करण्यात यावा.

कृपया सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव १२/४/१२
[ छाननी व तालिनीकरण.]

A1/Engg.Marathi./12